**ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मिळकतींवर कर आकारणी करुन वसुली करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः पंरास २०१६/प्र.क्र.१७/पंरा-४**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई ४०० ००१
तारीख: १८ जुलै, २०१६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ अन्वये ग्रामपंचायतीला असणाऱ्या कर आकारणी व वसुलीचे अधिकार संदर्भात शासनाने तातडीने परिपत्रक निर्गमित करुन जनमानसात व जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर करण्याबाबतच्या सूचना सर्व संबंधितांना कळविण्यात यावे अशी पंचायत राज समितीने शिफारस केली आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायतींच्या हद्दीतील मिळकतींवर कर आकारणी करुन वसुली करणे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६० यांमधील तरतुदींनुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधीन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधीन नाहीत) यावर ग्रामपंचायतीस कर बसविण्याचा अधिकार आहे. त्यानुषंगाने ग्रामपंचायत हद्दीतील मिळकतींवर विहीत पद्धतीने कर आकारणी करुन कर वसुली करण्याबाबत तसेच, याकरिता करपात्र मिळकतींच्या नोंदी ग्रामपंचायतीकडील नमुना नं. ८ म्हणजेच, कर आकारणी नोंदवहीमध्ये करण्याबाबत तरतूद आहे.

उक्त तरतुदीनुसार ग्रामपंचायत हद्दीतील ज्या इमारतींनी विहीत पद्धतीने बांधकाम परवानगी घेतलेली असो अथवा नसो अशा इमारतींची ग्रामपंचायतीकडील नमुना नं. ८ म्हणजेच, कर आकारणी नोंदवहीमध्ये नोंद घेण्यात येऊन विहीत पद्धतीने कर आकारणी करुन कर वसुलीची कार्यवाही करण्यात यावी. तसेच, नमुना नं. ८ म्हणजेच कर आकारणी नोंदवहीमध्ये इमारतीची नोंद घेतल्यामुळे अनधिकृत/अतिक्रमित/अवैध इमारती/बांधकाम अधिकृत होत नाही, याची नोंद घ्यावी.

सदर सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांनी त्यांच्या अधिनस्त संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे तात्काळ कार्यवाही केली जाईल व विहीत नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६०७१८११४२१३३६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay R Bankar

Digitally signed by Sanjay R Bankar
DN: CN = Sanjay R Bankar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2016.07.18 14:08:41 +05'30'

**(संजय बनकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, मलबार हिल, मुंबई ४०० ०३५
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व सह सचिव/उप सचिव (ग्रामविकास विभाग, मंत्रालय)
७. सर्व उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालय
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१०.सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि/ग्रापं)
११.कक्ष अधिकारी (संग्राम कक्ष) (ग्रा.वि.व ज.सं.वि.) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
१२.कक्ष अधिकारी (माहिती तंत्रज्ञान कक्ष) (ग्रा.वि.व ज.सं.वि.) बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
१३.निवडनस्ती कार्यासन पंरा-४